**आकाशवाणी नागपूर,**

**(मराठी - वेळ सायंकाळी ६.४०)**

**मंगळवार, दिनांक ०४ ऑगस्ट २०२०**

ठळक बातम्या ................................

- अयोध्येत राम मंदिराच्या भूमी पूजनाची जय्यत तयारी; भूमीपूजन उद्या होणार.
- केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षा २०१९ चे अंतिम निकाल जाहीर.
- आयकर फेसलेस ई-मूल्यांकन योजनेची अमलबजावणी सुरू: पारदर्शक कर प्रशासनाकडे मोठी झेप.
- नागपूर शाहारातील मालमत्ता कर वसुलीसाठी ३१ ऑगस्टपर्यन्त बिलांचं वितरण पूर्ण करण्याचे स्थायी समिति सभापतींचे निर्देश.

*********

अयोध्येत राम मंदिर बांधण्यासाठी भूमिपूजनाच्या आधीच्या तीन दिवसीय दीर्घ विधीच्या दुसऱ्या दिवशी आज सहा तास लांबीचे विशेष राम रचना अनुष्ठान केले गेले. उद्या भूमिपूजन सोहळा होणार असून यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी भाग घेतील. त्यांच्यासह देशभरातून आणि नेपाळमधील अनेक धार्मिक प्रमुख आणि संत या समारंभात भाग घेण्याची अपेक्षा आहे. या कार्यक्रमात 135 आध्यात्मिक परंपरा असलेले 135 हून अधिक संत उपस्थित राहणार आहेत. श्री राम जन्म भूमि तीर्थ क्षेत्र ट्रस्टतर्फे अयोध्येतील काही प्रतिष्ठित नागरिकांनाही आमंत्रित करण्यात आले आहे. दरम्यान, अयोध्येत आधीच उत्सवाच वातावरणात असून लोक उत्सुकतेने ऐतिहासिक क्षणाची वाट पहात आहेत. राम कीर्तन आणि रामचरितमानसाचा पाठ यासह अनेक धार्मिक उपक्रम अयोध्येत सुरू झाले आहेत.

दीपोत्सवाची तयारी सुरू असून पवित्र शरयू नदीच्या घाटांवर सुंदर सजावट केली आहे. उद्याच्या ऐतिहासिक भूमीपूजन सोहळ्यासाठी हे शहर सज्ज झाले आहे. उद्या श्री हनुमानगढी मंदिरात दर्शन घेतल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी श्री रामजन्मभूमी इथं श्रीरामाची पूजा करतील. त्यानंतर भूमिपूजन आणि रंगमंच कार्यक्रम होईल.

दरम्यान नागपूरात भाजप शहर अध्यक्ष आमदार प्रवीण दटके यांनी सांगितले की, या पवित्र सोहळ्याला ऐतेहासिक बनवण्यासाठी भारतीय जनता पार्टीतर्फे नागपुर शहरात सुमारे 300 ठिकाणी कार्यकर्त्यांद्वारा राम धुनचे वादन प्रसाद वितरण, भजन कीर्तन फ़टाकेबाजी करण्यात येईल. तसंच सायंकाळी दिवे प्रज्वलित करुन दिपोत्सव साजरा करण्यात येईल, असंही दटके यांनी सांगितलं.

तसंच नागपुरातील प्राचीन आणि सुप्रसिद्ध पोद्दरेश्वर राम मंदिरात आज सायंकाळ पासूनच रोषणाई करण्यात आली आहे.

*********

सर्वोच्च न्यायालय ते खालच्या न्यायालयांपर्यंतच्या वाढत्या प्रलंबित प्रकरणांविषयी उपराष्ट्रपती एम. वेंकय्या नायडू यांनी आज चिंता व्यक्त केली आणि सरकार आणि न्यायव्यवस्थेचं या विषयावर लक्ष वेधून वेगवान न्यायमिळवून देण्याचे आवाहन केले.

डॉ.बी.आर.आंबेडकर आंध्र विद्यापीठाच्या विधी विद्यालयाच्या 76 व्या वर्धापन दिनानिमित्त अमृत महोत्सवीसंमेलनास आज आभासी पद्धतीने संबोधित करताना उपराष्ट्रपतींनी जलद आणि किफायतशीर दरात न्याय मिळण्याची गरज अधोरेखित केली. प्रदीर्घ काळ खटल्यांना स्थगिती मिळत असल्याने न्याय मिळविण्याच्या प्रक्रियेतील खर्च वाढत जातो ही बाब

निदर्शनाला आणून देताना त्यांनी “ न्यायदानाला विलंब म्हणजेच न्याय नाकारणे ” या उक्तीची जाणीव करून दिली.

*********

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा 97 वा वर्धापन दिन समारंभ आज दिक्षांत सभागृहात संपन्न झाला. दुरदृश्यप्रणाली आणि ऑनलाईन पध्दतीनं आयोजित करण्यात येत आहे. समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून नॅक म्हणजेच राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेचे संचालक डॉ. एस.सी. शर्मा उपस्थित होते. समारंभाचे अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर होते. विद्यापीठानं एक संस्था म्हणून शैक्षणिक तसंच सामाजिक क्षेत्रात नव-नवे कार्य करण्याचा संकल्प या वर्धापनदिनानिमित्त करावा, असं आवाहन विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी यावेळी केले.

विद्यापीठाच्या वर्धापनदिनी विज्ञान, शिक्षण, सामाजिक तथा अन्य क्षेत्रात अतुलनीय कार्य करणाऱ्यांना ‘राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवनसाधना’ पुरस्कारानं सन्मानित केले जाते. 2020 ह्या वर्षासाठीचा सदर पुरस्कार जागतिक कीर्तीचे नामवंत चित्रकार चंद्रकांत चन्ने यांना प्रदान करण्यात आला. यावेळी शासकीय विज्ञान संस्थेचे विद्यार्थी संजय घोरमोडे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी दिपाली टेकाम या उत्कृष्ठ विद्यार्थी पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांनी आपले विचार दुरदृश्यप्रणालीद्वारे मांडले. वर्धापन दिन समारंभात राष्ट्रसंतांच्या बहुमुखी व्यक्तित्त्वाचा आणि विचारांचा धांडोळा घेणाऱ्या "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : साहित्यसुगंध" या ग्रंथाचेही प्रकाशन करण्यात आले. डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी या ग्रंथाचे संपादन केले आहे. याचवेळी, विद्यापीठाद्वारे मागासवर्गीयांच्या

उपयोगासाठी प्रकाशित "विद्यापीठ मार्गदर्शिका"चेही विमोचन याप्रसंगी करण्यात आले.

*********

उद्यापासून सुरू होणाऱ्या व्यायाम शाळा आणि योग संस्थाकरता केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. सरकारनं जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार स्पा-साउनासह, बाष्प स्नान आणि जलतरण तलाव बंद ठेवावे लागणार आहेत. प्रवेशद्वारावर सॅनिटाइजरसह तापमान मोजण्यासाठी थर्मल स्कॅनर असणं बंधनकारक आहे. कोविड-19 संसर्गाची लक्षणं नसणाऱ्यांनाच प्रवेश देणं, साधनसामग्रीचं निर्जंतुकीकरण करणं, प्रत्येक व्यक्तीसासाठी चार चौरस मीटर जागा असणं, एकमेकांमध्ये सहा फुट अंतर राखणं, मास्क ऐवजी चेहऱ्यावर पारदर्शक आवरण-फेस शिल्ड घालणं बंधनकारक असणार आहे.

*********

केंद्रीय लोकसेवा आयोगानं, नागरी सेवा परीक्षा २०१९ चे अंतिम निकाल आज जाहीर केले. नागरी सेवांच्या एकूण ९२७ पदांसाठी ही परीक्षा घेण्यात आली होती. निकालानंतर भारतीय प्रशासकीय, परराष्ट्र व्यवहार, आणि भारतीय पोलीस सेवेतल्या विविध पदांसाठी एकूण ८२९ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. या निकालात मुलांमधे प्रदीप सिंग यानं, तर मुलींमधे प्रतिभा वर्मा हीनं पहिला क्रमांक पटकावला आहे.निकाल केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर पाहता येईल. निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांनंतर गुण जाहीर केले जातील अशी माहिती केंद्रीय लोकसेवा आयोगानं दिली आहे. भारतीय सूचना सेवेत कार्यरत असलेले नागपूरतील निखिल सुधाकर दुबे तसच चंद्रपुर मधून सुमित सुधाकर रामटेके आणि प्रज्ञा कैलास खंडारे हे उत्तीर्ण झाले आहेत.

*********

600 आयकर अधिकाऱ्यांसह 3,130 आयकर कर्मचारी फेसलेस ई-मूल्यांकन योजनेच्या अंमलबजावणीत व्यग्र आहेत. फेसलेस मूल्यांकनसाठी निवडलेल्या, 58,319 प्रकरणांपैकी 8,700 प्रकरणांचा आधीच निपटारा करण्यात आला आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी 2019 च्या अर्थसंकल्पीय भाषणात प्रथम जाहीर केलेली ही योजना म्हणजे पारदर्शक कर प्रशासनाकडे मोठी झेप म्हणून पाहिले जात आहे.

"आम्ही प्रथमच ई-मूल्यांकन करत आहोत. पायाभूत सुविधा, मनुष्यबळ, हार्डवेअर आणि सॉफ्टवेअरशीसंबंधित सर्व बाबींवर लक्ष दिल्यानंतर जुलैपासून हे काम हाती घेण्यात आले आहे. सप्टेंबरच्या मध्यापर्यंत सर्वप्रकरणे पूर्ण करण्याचे आमचे लक्ष्य आहे." असे आयकर विभागाचे प्रधान मुख्य आयुक्त आणि केंद्रीय प्रत्यक्षकर मंडळाचे सदस्य एस.के. गुप्ता म्हणाले.

ऑक्टोबर 2019 मध्ये आयकर विभागाने आणलेल्या या योजनेमुळे मूल्यांकन अधिकारी आणि करदाते यांच्यामधील थेट संवाद संपुष्टात आला. या योजनेंतर्गत मुंबई, दिल्ली, कोलकाता, चेन्नई, बेंगळुरू, हैदराबाद, अहमदाबाद आणि पुणे ही आठ शहरे समाविष्ट आहेत. फेसलेस ई-मूल्यांकनसाठीच्या प्रकरणांमध्ये व्यक्ती, व्यवसाय, एमएसएमई तसेच मोठ्या कंपन्यांनी दाखल केलेल्या परताव्याचा समावेश असल्याचं गुप्ता यांनी सांगितलं.

*********

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचं थकलेलं वेतन लवकरच दिलं जाईल अशी माहिती परिवहन मंत्री परब यांनी ट्विटरवरून दिली आहे. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना मे महिन्यात केवळ पन्नास टक्के वेतन दिलं होतं, तसंच जून महिन्याचं वेतन अजूनही मिळालेलं नाही. यासंदर्भात आज उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी ५५० कोटी रुपयांच्या निधीला मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती परब यांनी ट्विटरवरून दिली आहे.

*********

देशात आतापर्यंत कोरोना संक्रमणातून बरे झालेल्या रुग्णांची एकूण संख्या १२ लाख ३० हजार ५०९ झाली आहे. ही संख्या सध्या कोरोना संक्रमणावर उपचार घेत असलेल्या रुग्णांच्या संख्येपेक्षा दुप्पट आहे. सध्या देशात पाच लाख ८६ हजार २९८ रूग्ण उपचार घेत आहेत. दरम्यान, देशात गेल्या २४ तासात देशात कोविड १९ चे एकूण ५२ हजार ५० नवे रूग्ण आढळले, तर ४४ हजार ३०६ रुग्ण बरे झाले असल्याची माहिती आरोग्य मंत्रालयाकडून दिली. देशात सध्या या विषाणूने बाधित रुग्णांची एकूण संख्या १८ लाख ५५ हजार ७४५ झाली आहे.

देशात गेल्या २४ तासांत कोविड १९ च्या सहा लाख ६१ हजार ८९२ नमून्यांची चाचणी झाली. ही संख्या आतापर्यंत केलेल्या चाचण्यांच्या संख्येपैकी सर्वात जास्त आहे. आतापर्यंत देशात कोविड-१९ च्या दोन कोटी आठ लाख ६४ हजार चाचण्या झाल्या आहेत. सध्या देशात या चाचण्यांसाठी एक हजार ३५६ प्रयोगशाळा असून, यापैकी ९१७ प्रयोगशाळा सरकारी तर ४३९ प्रयोगशाळा खाजगी असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

राज्यात काल 10 हजार 221 रुग्ण कोरोनामुक्त होऊन घरी गेले. राज्यात आतापर्यंत कोरोनाचे 2 लाख 87 हजार 20 रुग्ण बरे झाले असून बरे होण्याचं प्रमाण 63 पूर्णांक 76 शतांश टक्के आहे, तर 8 हजार 969 नवे कोरोनाबाधित रुग्ण आढळले.

*********

कोव्हिड-१९च्या पार्श्र्वभूमीवर नागपूर शहरातील मालमत्ता कर वसुली थांबली होती. मनपाच्या उत्पन्नाचे स्त्रोत कर स्वरूपात मिळणारा महसूल हेच आहे. त्यामुळे आता जास्तीत जास्त कर वसुलीकडे लक्ष देण्याची गरज आहे. त्याअनुषंगाने सर्व झोनस्तरावर कार्यवाहीला गती देण्यात यावी व येत्या ३१

ऑगस्टपर्यंत उर्वरित सर्व बिलांचे वितरण पूर्ण करा, असे निर्देश स्थायी समिती सभापती विजय (पिंटू) झलके यांनी दिले.

मालमत्ता कर वसुलीसंदर्भात आज मनपा मुख्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात झोननिहाय आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीत स्थायी समिती सभापती विजय झलके, माजी स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे, उपायुक्त (महसूल) मिलींद मेश्राम आदी उपस्थित होते.

प्रारंभी स्थायी समिती सभापतींनी दहाही झोनच्या मालमत्ता कर संबंधी वसुलीचा आढावा घेतला. मालमत्ता कर वसुलीसंदर्भात नगरसेवकांशी समन्वय साधण्यात यावा. झोनस्तरावर नगरसेवकांच्या सहकार्याने प्रभागनिहाय कर आकारणी शिबिर घेण्यात यावेत, असेही त्यांनी यावेळी निर्देशित केले.

*********

The End